**<u>प्रेसनोट दि.१७/०४/२०१९</u>**

**<u>खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर.</u>**

**<u>'अवघ्या दोन तासांत लावला हरवलेल्या बॅगचा तपास'</u>**

आज दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी ११/३० वा.चे सुमारास मा.अपर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांनी आम्हास फोनव्दारे कळवीले की,महिला हया दि. १४/०४/२०१९ रोजी रात्री कोथरुड येथुन ओला कॅब गाडी नंबर एम.एच.१२/एन.एक्स/०५१९ या कार मध्ये बसल्या व संगमवाडी ब्रीज येथील ट्रॅव्हल्स पॉईटला उतरल्या व संगमवाडी येथुन त्या रात्री ट्रॅव्हल्सव्दारे नागपुर येथे गेल्या आहेत. ओला कॅबमधुन उतरते वेळी सदर महिला यांची एक लाल रंगाची बॅग चुकुन सदर कार मध्ये विसरली आहे. तरी सदर बॅग चा शोध घ्यावा वगैरे कळवले. त्यावर आम्ही स्वतः खडकी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री महाडीक यांना सदर बॅग चा तात्काळ शोध घेणेबाबत आदेशीत केले असता त्यांनी तात्काळ पो.हवा.१७३ ठोकळ, पो.शि.१२०१२ सोनवणे, पो.शि.८८११ माने यांचे मदतीने सदर गाडी नंबरवरुन वाहन चालक व मालकाचा शोध घेतला. त्यावेळी सदर कार सिध्दी टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स एजन्सी मालकाचे पत्त्यावर जावुन,त्यांचेकडे वरिल नमुद महिलेचे बॅग बाबत चौकशी केली असता,त्यांनी त्यांची गाडी त्यांचे मेव्हणे यांना चालवीणेस दिली असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यांनी लागलीच फोनव्दारे संपर्क साधुन बॅग बाबत चौकशी केली असता,सदर बॅग त्यांचे ताब्यात असल्याचे त्यांनी सांगीतले व साधारण १३/३० वा.चे सुमारास श्री.खरात यांनी त्यांचे गाडीमध्ये विसरुन राहिलेली बॅग पोलीसांचे ताब्यात दिली.

तदनंतर आम्ही स्वतः सदर बॅग बाबत महिला नामे सृष्टी जोशी यांचेशी फोनवरुन खात्री करुन,ती त्यांचीच असल्याची खात्री झाल्याने,त्यांचे पुण्यातील नातेवाईकांचे ताब्यात देणेची तजवीज ठेवली आहे.

एकंदरीत सदर सदर महिलेचे बॅगचा अवघ्या दोन तासांचे आत पोलीस उप-निरीक्षक, महाडीक, पो.हवा.१७३ ठोकळ, पो.शि.१२०१२ सोनवणे व पो.शि.८८११ माने यांनी प्रयत्नपुर्वक शोध घेवुन बॅग ताब्यात घेवुन उत्तम कामगीरी केली आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.